प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

# अग्निशमन सेवा सप्ताहानिमित्त पनवेल ते खारघर जनजागृती रॅली

## अग्निप्रतिबंधक उपाययोजना व दक्षता यांची नागरिकांना दिली माहिती

**पनवेल : विक्रम बाबर**

अग्निशमन सेवा सप्ताह २०२५ निमित्ताने पनवेल महानगरपालिका आणि सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन पनवेल ते खार-घरदरम्यान भव्य वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीतून नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जनजागृती घडविण्याचा संदेश देण्यात आला.

महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही रॅली आज सकाळी १० वाजता नवीन पनवेल अग्निशमन केंद्र येथून सुरू झाली. रॅलीमध्ये पनवेल महापालिकेचे मुख्य अग्निशमन





अधिकारी प्रवीण बोडखे, अधिकारी हरिदास सुर्यवंशी, उप अधिकारी संदीप पाटील तसेच महिला व पुरुष अग्निशमन कर्मचारी सहभागी झाले होते.

रॅलीचा मार्ग नवीन पनवेलमधून सुरू होऊन खांदा कॉलनीतील ब्रिजमार्गे कामोठे, मंकी पॉइंट खारघर, शिल्प चौक, रामशेठ ठाकूर शाळा, ग्रामविकास भवन मार्गे खारघर अग्निशमन केंद्र येथे संपला.

या रॅलीत १० बुलेट दुचाकी, ४ जीप, २ स्विफ्ट डिझायर कार आणि १२ अग्निशमन वाहने सहभागी झाली होती. रॅलीदरम्यान अग्निशमन दलाने नागरिकांमध्ये सजगतेचा संदेश दिला. एकत्र येऊ, अग्निसुरक्षित भारत घडवू असा संदेश देत नागरिकांनी सजग रहावे, असे आवाहन करण्यात आले. दरवर्षी १४ ते २० एप्रिल दरम्यान अग्निशमन सेवा सप्ताह साजरा केला जातो. १४ एप्रिल १९४४ रोजी मुंबईतील व्हिक्टोरिया डॉक येथे घडलेल्या भीषण दुर्घटनेत ७१ अग्निशमन कर्मचाऱ्यांनी प्राणांची आहुती दिली होती. त्यांच्या स्मरणार्थ व नागरिकांमध्ये जागरूकता वाढवण्यासाठी हा सप्ताह साजरा केला जातो.

या सप्ताहात पनवेल महापालिकेच्या अग्निशमन विभागातर्फे विविध प्रात्यक्षिके, प्रशिक्षण सत्रे, मॉक ड्रिल्स आणि जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

### मॉकड्रिलला नागरिकांचा प्रतिसाद

कळंबोली येथील डिमार्ट येथे अग्निशमन दलाच्यावतीने मॉकड्रिलचे आयोजन करण्यात आले होते. यामधून नागरिक, कर्मचारी, उद्योग व संस्था यांना अग्निसुरक्षेबाबत अधिक सजग करण्यात आले.नागरिकांनी देखील या उपक्रमात सक्रीय सहभागी होवून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अन्य देखील या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !
ठाणे, सोमवार
दि. २१ एप्रिल २०२५

## पनवेल महानगरपालिका व सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने

# अग्निशमन सेवा सप्ताह अंतर्गत नवीन पनवेल ते खारघर भव्य वाहन रॅलीद्वारे जनजागृती

पनवेल : अग्निशमन सेवा सप्ताह २०२५ निमित्त नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने पनवेल महानगरपालिका अग्निशमन दल व सिडको अग्निशमन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक १९ एप्रिल रोजी नवीन पनवेल ते खारघर अशी भव्य अग्निशमन वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या रॅलीची सकाळी १०:०० वाजता नवीन पनवेल अग्निशमन केंद्र येथून सुरूवात करण्यात आली. पनवेल महापालिकेच्यावतीने मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, अग्निशमन अधिकारी हरिदास सुर्यवंशी, उप अग्निशमन अधिकारी संदीप पाटील तसेच महापालिकेतील महिला व पुरुष अग्निशमन कर्मचाऱ्यांनी या रॅलीचे प्रतिनिधित्व केले.

नवीन पनवेल अग्निशमन केंद्र येथून सुरुवात झालेली ही रॅली खांदा कॉलनीमधील ब्रिजमार्गे कामोठे, कामोठे ते महामार्गावरून मंकी पॉइंट खारघर, मंकी पॉइंट ते शिल्प चौक, शिल्प चौक ते रामशेठ ठाकूर शाळा, ग्रामविकास भवन या मार्गाने येत खारघर अग्निशमन केंद्र येथे रॅलीची सांगता झाली.




या रॅलीमध्ये महापालिकेच्या अग्निशमन विभागातील १० बुलेट दुचाकी, ४ जीप, २ स्विफ्ट डिझायर कार, १२ अग्निशमन वाहने सहभागी झाली होती.

या रॅली दरम्यान अग्निशमन दल हे सजगतेचे व तत्परतेचे प्रतीक ठरणार आहे, नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे आणि अग्निसुरक्षेबाबत सजग व्हावे, असे आवाहन करण्यात आले. या रॅलीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी ,"एकत्र येऊ, अग्निसुरक्षित भारत घडवू" असा संदेश देण्यात आला.

> अग्निशमन सेवा सप्ताह दरवर्षी १४ ते २० एप्रिल दरम्यान साजरा केला जातो. १४ एप्रिल १९४४ रोजी मुंबईतील व्हिक्टोरिया डॉक येथे झालेल्या दुर्घटनेत ७१ शूर अग्निशमन कर्मचाऱ्यांनी प्राणांची आहुती दिली होती. त्यांच्या स्मरणार्थ आणि समाजात अग्निसुरक्षेबाबत जागरूकता वाढवण्यासाठी हा सप्ताह साजरा केला जातो. महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्यावतीने या सप्ताहादरम्यान विविध प्रात्यक्षिके, कळंबोली डिमार्ट येथे मॉक ड्रिल्स, प्रशिक्षण कार्यक्रम आणि जनजागृती उपक्रम घेण्यात आले.जेणेकरून नागरिक, कर्मचारी, उद्योग आणि संस्था अग्निसुरक्षेबाबत अधिक सजग होतील.

### पनवेल महानगरपालिका व सिडको यांच्या संयुक्त विद्यमाने...

# अग्निशमन सेवा सप्ताह अंतर्गत नवीन पनवेल ते खारघर भव्य वाहन रॅलीद्वारे जनजागृती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अग्निशमन सेवा सप्ताह २०२५ निमित्त नागरिकांमध्ये अग्निसुरक्षेबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने पनवेल महानगरपालिका अग्निशमन दल व सिडको अग्निशमन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आज दिनांक १९ एप्रिल रोजी नवीन पनवेल ते खारघर अशी भव्य अग्निशमन वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या रॅलीची सकाळी १०:०० वाजता नवीन पनवेल अग्निशमन केंद्र येथून सुरूवात करण्यात आली. पनवेल महापालिकेच्यावतीने मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, अग्निशमन अधिकारी हरिदास सुर्यवंशी, उप अग्निशमन अधिकारी संदीप पाटील तसेच महापालिकेतील महिला व पुरुष अग्निशमन कर्मचाऱ्यांनी या रॅलीचे प्रतिनिधित्व केले.

नवीन पनवेल अग्निशमन केंद्र येथून सुरुवात झालेली ही रॅली खांदा कॉलनीमधील ब्रिजमार्गे कामोठे, कामोठे ते महामार्गावरून मंकी पॉइंट खारघर, मंकी पॉइंट ते शिल्प चौक, शिल्प चौक ते रामशेठ ठाकूर शाळा, ग्रामविकास भवन या मार्गाने येत खारघर अग्निशमन केंद्र येथे रॅलीची सांगता झाली. या रॅलीमध्ये महापालिकेच्या



अग्निशमन विभागातील १० बुलेट दुचाकी, ४ जीप, २ स्विफ्ट डिझायर कार, १२ अग्निशमन वाहने सहभागी झाली होती.

या रॅली दरम्यान अग्निशमन दल हे सजगतेचे व तत्परतेचे प्रतीक ठरणार आहे, नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे आणि अग्निसुरक्षेबाबत सजग व्हावे, असे आवाहन करण्यात आले. या रॅलीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी ,एकत्र येऊ, अग्निसुरक्षित भारत घडवू असा संदेश देण्यात आला.

अग्निशमन सेवा सप्ताह दरवर्षी १४ ते २० एप्रिल दरम्यान साजरा केला जातो. १४ एप्रिल १९४४ रोजी मुंबईतील व्हिक्टोरिया डॉक येथे झालेल्या दुर्घटनेत ७१ शूर अग्निशमन कर्मचाऱ्यांनी प्राणांची आहुती दिली होती. त्यांच्या स्मरणार्थ आणि समाजात अग्निसुरक्षेबाबत जागरूकता वाढवण्यासाठी हा सप्ताह साजरा केला जातो. महापालिकेच्या अग्निशमन विभागाच्यावतीने या सप्ताहादरम्यान विविध प्रात्यक्षिके, कळंबोली डिमार्ट येथे मॉक ड्रिल्स, प्रशिक्षण कार्यक्रम आणि जनजागृती उपक्रम घेण्यात आले.जेणेकरून नागरिक, कर्मचारी, उद्योग आणि संस्था अग्निसुरक्षेबाबत अधिक सजग होतील.